सत्यमेव जयते

**जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर यांचे कार्यालय**

आकाशवाणी चौक, सिव्हील लाईन्स, नागपूर

**दुरध्वनी** - 0712-2541832 **ई-मेल** - dydeonagpur@gmail.com


**क्रमांक/म.सहा./जि.नि.का./कार्या. 3/सं.नों.क्र.20/का.वि.-96/2022** **दिनांक :- 15 फेब्रुवारी, 2022**

**प्रति,**

**मा. कुलगुरु,**

........................................................................,

नागपूर

**विषय** :- राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धा (National Voters' Awareness Contest) यामध्ये सहभागी होण्याकरीता प्रोस्ताहित करण्याबाबत.

**संदर्भ** :- **१) मा. उप सचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी,** महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२२ /प्र.क्र. ११४/२२/३३, दिनांक १० फेब्रुवारी, २०२२,

**२) मा. भारत निवडणूक आयोग, नवि दिल्ली** यांचे कार्यालयीन पत्र क्र. ४९१/SVEEP-II/Online contest/ २०२२, दि. ०५/०२/२०२२ चे पत्र

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, मा. भारत निवडणूक आयोग, नवि दिल्ली यांचे निर्देशान्वये दिनांक 25 जानेवारी, 2022 ते 15 मार्च, 2022 या कालावधीत राष्ट्रीय मतदार जागृती स्पर्धांच्या अंतर्गत अ) प्रश्न मंजुषा स्पर्धा, ब) व्हिडीओ तयार करण्याची स्पर्धा, क) पोस्टरची डिझाईन करण्याची स्पर्धा, ड) गाण्याची स्पर्धा, ई) घोषवाक्य (Slogan) तयार करण्याची स्पर्धा अशा पाच प्रकारच्या स्पर्धा आयोजित केलेल्या आहेत. सदर स्पर्धेची सविस्तर माहिती http://ecisveep.nic.in/contest/ येथे तसेच खाली दर्शविलेल्या क्यु. आर. कोड स्कॅन करुन संबंधितांना प्राप्त करुन घेता येईल.

सदर स्पर्धेमध्ये नागपूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभागी होण्याच्या दृष्टीने, व्यापक स्वरुपाची प्रसिध्दी होणे आवश्यक आहे. त्याकरीता, आपले अधिनस्त सर्व कार्यालयामध्ये, शाळा व महाविद्यालयामध्ये सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्याकरीता प्रोत्साहीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार, आपले अधिनस्त संबंधीतांना कळविण्यात यावे, हि विनंती.

**सहपत्र** — संदर्भीय पत्र व प्रचार पर लिफलेट

(आर. विमला)

**जिल्हाधिकारी तथा**

**जिल्हा निवडणूक अधिकारी,**

**नागपूर**